# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**5 JULY, 2018**

[Time : 14-00]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(30 Words Per Minute)

**SECTION - I**

**(Time Allowed : 1 Hour)**

**मराठी टंकलेखन**

(३० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - १**

(वेळ : १ तास)

---

**प्र.1)** पुढील पत्र आकर्षक मांडणी करून टंकलिखित करा : **[गुण : ३०]**

**कै. नानासाहेब परुळेकर विद्यालय**

मधले मार्केट, फलटण,

जिल्हा सातारा

जावक क्रमांक : नाप/७२६ई/२० दिनांक : आजचा टाका

प्रति,

मा. श्री मोहन कुलकर्णी,

प्रमुख शिक्षणाधिकारी,

महाराष्ट्र राज्य, पुणे विभाग,

पुणे - ४११ ००४

विषय : स्नेहसंमेलनास प्रमुख पाहुणे म्हणून आल्याबद्दल आभारपत्र

महोदय,

गेल्या महिन्यात आमच्या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. त्या सोहळ्यासाठी आपण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिलात, त्याबद्दल आम्ही सर्व शिक्षक व विद्यार्थी आपले अतिशय आभारी आहोत.

आपण अनेक महत्त्वाच्या कामांत व्यग्र असतानाही इतक्या लांब फलटण येथे आलात, आणि विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केलेत, याबद्दल आम्ही आपले अत्यंत कृतज्ञ आहोत. आपल्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना शिक्षणाविषयी मोलाचे विचार ऐकायला मिळाले. मोठ्या शहरातील विद्यार्थी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थी

यांच्या शिक्षणात अंतर का पडते याची मौलिक चिकित्सा करून आपण आम्हांला प्रेरणादायी मार्गदर्शन केले. तसेच अवांतर वाचनाचे महत्त्वही आपण विद्यार्थ्यांना पटवून दिले.

आपण आल्यावद्दल पुन्हा एकदा आभार.

आपला विश्वासू,

श्री. महेश शिंदे
मुख्याध्यापक,
कै. नानासाहेब परुळेकर विद्यालय

सोबत : काही नाही.

**प्र.2)** पुढील रकाना टंकलिखित करा. रकान्याच्या ओळी टंकलेखन यंत्रावर अथवा शाईने आखा. दर्शकबिंदू आवश्यक आहेत : **[गुण ३०]**

**पुण्यातील पादत्राणे विक्री दर्शविणारा तक्ता**

(आकडे नगात)

| अनु. क्रमांक | महिने | | मोजडी | कोल्हापूरी | फॅन्सी वेअर |
|---|---|---|---|---|---|
| १. | जानेवारी, २०१३ | .. | ७,२९३ | ५,०१६ | ९१८ |
| २. | फेब्रुवारी, २०१३ | .. | ९२६ | ७,२०१ | २,०१६ |
| ३. | मार्च, २०१३ | .. | ९,८१६ | ३,०१६ | ७,०१४ |
| ४. | एप्रिल, २०१३ | .. | ३,०१६ | ७,२०१ | २,०१७ |
| ५. | मे, २०१३ | .. | २९० | ३,०२६ | ९,१०२ |
| ६. | जून, २०१३ | .. | ४,०१५ | ७,२०३ | ६,१९२ |
| ७. | जुलै, २०१३ | .. | २,०१७ | २,०१७ | २०८ |
| ८. | ऑगस्ट, २०१३ | .. | २९३ | ४,०२६ | २९३ |